<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२/२०२५</u>

<u>निशाणी क्र.१२ सोबत</u>

<u>अर्जदारचा पुढील सरतपास शपथेवर सुरु.</u>

<u>सरतपास विधीज्ञ श्री.एम.एम. मुळे यांचेतर्फे</u>

माझे पुराव्याच्या शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे व माहितीप्रमाणे लिहीणेत आला असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. मी गैरअर्जदारास दि.१६.११.२०२४ रोजी विधीज्ञांमार्फत नोटीस पाठविली होती. सदरची नोटीस पटलावर सादर केली आहे. आता साक्षीदारास दि.१६.११.२०२४ रोजीची नोटीस दाखविण्यत आली. ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व माझ्या विधीज्ञांची सही आहे. सबब त्यास **निशाणी क्र.१४** देण्यात येत आहे. गैरअर्जदाराने मला मी पाठविलेल्या नोटीसीला उत्तर पाठविले होते. सदर उत्तरास मी प्रतिउत्तर दि.१०.१२.२०२४ रोजी पाठविले होते. आता साक्षीदारास दि.१०.१२.२०२४ रोजीचे प्रतिउत्तर दाखविण्यात आले. तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व माझ्या विधीज्ञांची सही आहे. सबब त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात येत आहे. पटलावर पोस्टाच्या दोन पोहोचपावत्या सादर केल्या आहेत. आता साक्षीदारास सदरच्या पोहोचपावत्या दाखविण्यात आल्या. ते तेच आहेत. सबब, त्यास **निशाणी क्र.१६ व १७** देण्यात येत आहे. मी पटलावर गैरअर्जदारचे खाते उतारा ४६०६, गट क्र.२१३ चा ७/१२ उतारा, खाते क्र.३९८३चा उतारा, गट क्र.१९७ चा ७/१२ उतारा, खाते क्र.४६०५ चा उतारा, गट क्र.११७१ चा ७/१२ उतारा, खाते क्र.४६०७ चा उतारा, गट क्र.६३८ चा ७/१२ उतारे सादर केले आहेत. आता साक्षीदारास सदरचे उतारे दाखविण्यात आले. ते तेच आहेत. सबब, त्यास **निशाणी क्र.१८ ते २५** देण्यात येत आहे. गैरअर्जदाराने मला मारहाण केली होती त्याची छायाचित्रे पटलावर सादर केली आहे. आता साक्षीदारास दोन छायाचित्रे

दाखविण्यात आली.  ते तेच आहेत. सबब, त्यास एकत्रितरित्या **वस्तु क्र.अ** देण्यात येत आहे.

गैरअर्जदार व त्यांचे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर सबब, त्योचविरोधात विनाउलटतपासाचा आदेश पारीत करण्यात आला आहे.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,**
**जबाब माझ्यासमक्ष नोंदविला.**

SHAIKH MOHAMMED AAMER
Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2026.04.15 17:23:32 +0530

पलूस. (एम.ए.एम.जे. शेख)
दिनांक १५.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पलूस.